# द्राक्ष वाणांची विविधता

**निर्यातक्षम द्राक्ष उत्पादनासाठी योग्य द्राक्ष जातींची निवड अत्यंत महत्त्वाची आहे. स्थानिक वातावरण, मातीचे गुणधर्म, बाजारपेठ या सगळ्या बाबींचा अभ्यास केल्यानंतरच लागवडीसाठी योग्य द्राक्ष वाणाची निवड करावी.**

**डॉ. प्रशांत निकुंभे, डॉ. निशांत देशमुख, डॉ. आर. जी. सोमकुंवर**

निर्यातक्षम द्राक्ष उत्पादनासाठी योग्य द्राक्ष जातींची निवड अत्यंत महत्त्वाची आहे. स्थानिक वातावरण, मातीचे गुणधर्म, बाजारपेठ या सगळ्या बाबींचा अभ्यास केल्यानंतरच लागवडीसाठी योग्य द्राक्ष वाणाची निवड करावी. द्राक्ष बाग उभारणीसाठी लागणारा खर्च हा इतर फळपिकांच्या तुलनेत सर्वात जास्त असतो. त्यासाठी स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून योग्य वाणाची लागवड केल्यास निर्यातक्षम द्राक्ष उत्पादन मिळणे शक्य होते. त्यामुळे स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये चांगले दर मिळण्यास मदत होते.

## वाण निवड

**स्थानिक, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी वाण :**

थॉम्पसन सीडलेस, टू ए क्लोन, माणिक चमन, सोनाका, सुपर सोनाका, मांजरी नवीन, क्रीमसन सीडलेस, फ्लेम सीडलेस, मांजरी श्यामा, फॅन्टसी सीडलेस व रेडग्लोब इ.

**बेदाणे निर्मिती :** थॉम्पसन सीडलेस, मांजरी किशमिश व माणिक चमन इ.


**ज्यूससाठी :** मांजरी मेडिका

## असा असावा द्राक्षघड


- वजन : ४५० ते ५०० ग्रॅम
- मण्याची संख्या : १०० ते ११० मणी प्रतिघड
- मण्यातील गोडी : कमीत कमी १८ डिग्री
- मण्याची जाडी : १८ मिमी
- मण्याचे वजन : ४ ते ५ ग्रॅम
- मण्याचा रंग : एकसारखा रंग
- घडाची ठेवण : सुटसुटीत आणि कीड-रोगविरहित.

## निर्यातक्षम द्राक्ष वाण



सोनाका



फ्लेम सीडलेस



फॅन्टसी सीडलेस


क्रीमसन सीडलेस

## बेदाणे निर्मितीकरिता...


मांजरी किशमिश


दर्जेदार बेदाणा निर्मितीसाठी योग्य वाणांची निवड करावी.


मांजरी मेडिका